रेमुनं. ४३/२०१३
श्रीकांत विरुध्द चंद्रकांत

## नि. क. ३१ खालील आदेश

१ प्रतिवादी क्रमांक ३ यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ प्रमाणे कैफीयतीमध्ये दुरुस्ती करण्यासाठी दिलेला आहे. अर्जातील कथनानुसार कैफीयतीमध्ये नजरचुकीने व हस्तदोषाने मिळकतीचा नंबर व क्षेत्र चुकीचे नमूद झाले असून प्रतिवादी हे कैफीयतीमधील परिच्छेद क्रमांक २ व ३ मध्ये गट नंबर २६६/क पैकी ६—आर या ठिकाणी गट नंबर २६६/३ पैकी ५—आर असे नमूद करु इच्छित आहे. तसेच कलम ३ मध्ये शेवटच्या ओळीमध्ये २६६/क ऐवजी २६६/३ नमूद करणे आवश्यक असुन कलम ९ मधील ओळ क्रमांक २ मध्ये वादी ऐवजी प्रतिवादी अशी दुरुस्ती करणे आवश्यक आहे. प्रतिवादीला संबधित खरेदीपत्राची प्रत व सात बारा उता—याची प्रत मिळण्यास उशीर झाल्यामुळे मुदतीमध्ये अर्ज दाखल करता आला नाही. प्रतिवादीने नि. २७ कडे प्रस्तुत अर्जात नमूद केलेल्या दुरुस्तीसाठी दिलेला अर्ज केवळ कागदोपत्री आधार नसल्यामुळे नामंजूर झालेला आहे. प्रतिवादीने मागणी केलेली दुरुस्ती ही दाव्याचा निकालासाठी आवश्यक असलेमुळे अर्ज मंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

२ वादीने नि. ३६ कडे अर्जास म्हणणे देवून हरकत घेतली. वादीचे कथनानुसार प्रकरणामधील दिनांक २३/३/२०१५ रोजी मुद्दे काढलेले असल्यामुळे न्यायचौकशी सुरु झालेली आहे. प्रतिवादीने दुरुस्तीसाठी कोणतेही संयुक्तिक व कायदेशीर कारण नमूद केलेले नाही. तसेच प्रतिवादीने नि. २७ कडे दिलेलो अर्ज गुणदोषाचा विचार होवून नामंजूर करणेत आलेला आहे. प्रस्तुतचा अर्ज विलंबाने दाखल केला असुन त्यासाठी कोणतेही संयुक्तिक कारण प्रतिवादीने दाखवलेले नाही. सबब अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

३ दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. तसेच वादीने नि. ३८ कडे दिलेल्या लेखी युक्तीवादाचे अवलोकन केले. कागदपत्रांची पडताळणी केली. पुढील मुद्दे उपस्थित होत असून त्याचे निष्कर्ष कारणासहीत पुढीलप्रमाणे नोंदवत आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | प्रतिवादी हा मागणीप्रमाणे दुरुस्तीसाठी पात्र आहे का ? | होकारार्थी |
| २ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ व २ साठी** :—

४ प्रस्तुतचा दावा वाटपासाठी दाखल करणेत आलेला आहे. प्रतिवादी क्रमांक ३ ही वादीची बहीण आहे. प्रतिवादी क्र. ३ ने नि. १९ कडे कैफीयत देवून वादीच्या दाव्यातील कथनांचा इन्कार केलेला आहे. प्रतिवादीचे कथनानुसार गट नंबर २६६/क पैकी सहा आर क्षेत्र वादी व त्याचे वडील यांनी खरेदी केले. सदर कैफीयतीतील कथने पाहता प्रतिवादीने स्पष्टपणे गट नंबर २६६/क पैकी सहा आर क्षेत्र खरेदी केल्याचे नमूद केले आहे. परंतु आज या अर्जानुसार प्रतिवादी सदर गट नंबर हा २६६/३ क्षेत्र पाच आर असल्याचे नमूद करु इच्छित आहे. सदर दुरुस्तीसाठी प्रतिवादीने प्रस्तुत प्रकरणात निशाणी ३४ सोबत दिनांक ५/१२/१९८५ रोजीचे खरेदीखत दाखल केले आहे. सदर खरेदीखताची पडताळणी करता असे दिसुन येते की, वादी क्र. १ ने व प्रतिवादी क्र. १ ने दत्तात्रय बनकर व इतर यांचेकडून सर्व्हे नंबर २६६ हिस्सा क्रमांक ३ पैकी जमीन खरेदी केली होती. सदर मिळकतीचा सात बारा उतारा दाखल करण्यात आला आहे. प्रस्तुत प्रकरणात दोन्ही बाजूंच्या युक्तीवादानुसार नि. २७ कडे यापुर्वी अशाच प्रकारच्या दुरुस्तीसाठी अर्ज दिला होता व तो नामंजूर झालेला आहे. मी सदर आदेशाचे अवलोकन केले. सदर अर्ज नामंजूर होणेसाठी एकमेव कारण म्हणजे प्रतिवादीने मागणी केलेल्या दुरुस्तीसाठी कागदोपत्री आधार दिलेला नव्हता. प्रस्तुतचा अर्ज दाखल करताना प्रतिवादीने सदर खरेदीखताची प्रत व सात बारा उतारा दाखल केलेला आहे. वादीतर्फे वकीलांनी नामदार सर्वोच्च न्यायालयाच्या **विद्याबाई विरुध्द पद्मलता २००९(१) ऑलएमआर ४७१** या न्यायनिवाडयाचा आधार घेत असा युक्तीवाद केला की, ज्यावेळी दाव्यामध्ये मुद्दे काढले जातात व पुरावा दिला जातो त्यावेळी न्यायचौकशी सुरु झालेली असते. प्रस्तुत प्रकरणात मुद्दे काढणेत आलेले असुन वादीने शपथपत्र दाखल केले असलेमुळे न्यायचौकशी सुरु झालेली आहे. सबब अर्ज चालणेस पात्र नाही असा युक्तीवाद करणेत आला. प्रतिवादीतर्फे वकीलांनी असा युक्तीवाद केला की, दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ च्या परंतुकाप्रमाणे

न्यायचौकशी सुरु झाली असतानाही जर समाधानकारक कारण स्पष्ट केल्यास दुरुस्ती करता येते. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. वादीने दाखल केलेला न्यायनिवाडा हा प्रचलित न्यायतत्व विषद करणारा आहे त्यामुळे त्याबाबत दुमत नाही. प्रतिवादीने नि. १९ कडे कैफीयत दाखल केलेली असुन स. नं. २६६—क या बारामती येथील मिळकतीचा उल्लेख केलेला आहे. प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी असल्यामुळे सर्व मिळकती दाव्यात समाविष्ट होणे आवश्यक आहे. प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज देताना संबंधित खरेदीपत्राची प्रत दाखल केलेली आहे. सबब जरी निशाणी २७ कडील अर्ज नामंजूर झालेला असला तरी सुध्दा प्रस्तुतचा अर्ज कागदपत्रासह दाखल केला असल्यामुळे मंजूर होणेस पात्र आहे. प्रतिवादी मागणी करत असलेली दुरुस्ती ही वादीच्या वादकथनावर परिणाम करणारी नसुन दाव्याचा निकाल गुणदोषावर होणेसाठी मदत करणारी आहे. सबब मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र. २ साठी पुढील आदेश करीत आहे.

## <u>आदेश</u>

१ अर्ज मंजूर करणेत आला.
२ विहीत दुरुस्ती १४ दिवसाचे आत करावी.
३ खर्च कारणपरत्वे.

दिनांक १९/१२/२०१५

सुमित वि. जोशी
सह दिवाणी न्यायाधीश क. स्त., दौंड
जि. पुणे